REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 1 | OCTOBER - 2018

# डिकसळ (ता. इंदापूर) गावचा इतिहास

प्रा. सुरेंद्र अर्जुन शिरसट
सहाय्यक प्राध्यापक, इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे,
कला महाविद्यालय, भिगवण, ता. इंदापूर, जि.पुणे.

## भौगोलिक माहितीः-

डिकसळ हे गाव इंदापूर शहराच्या वायव्य दिशेस असून पुणे-सोलापुर महामार्गावरील भिगवण गावापासून सुमारे ५ कि. मी. अंतरावर आहे. हे गाव भीमा नदीकिनारी वसलेले आहे. गावाच्या लगत दक्षिणेसकोंढार-चिंचोली (ता. करमाळा, जि. सोलापुर ), पश्चिमेसतक्रारवाडी,भिगवण (ता. इंदापूर, जि. पुणे ), पुर्वेलाखानवटा वउत्तरेसराजेगाव (ता. दौंड, जि. पुणे ) ही गावे वसलेली आहेत. हे गाव सातारा - अहमदनगर राज्य मार्गावर वसलेले असून गावाच्या दक्षिणेस भीमा नदी तर उत्तर बाजूस पुणे - चेन्नई रेल्वेमार्ग आहे.

## डिकसळ गावनामाची उत्पत्ती:-

डिकसळ हे अनोखे नाव असून त्यातून त्यानामाचा स्पष्ट अर्थ व्यक्त होत नाही. गावाच्या इतिहासलेखनात नावाच्या उत्पत्तीची उकल महत्वाची वाटते. डिकसळ बाबत ही पुर्तता होत नाही. काही स्थानिक नागरिकांच्या मते डिकसळ येथे रेल्वेसाठी नदीवर पूल उभारणी वेळी गावरचना स्पष्ट तयार झाली म्हणून डिकसळ हे नाव पडले. त्यांचे मते डिकसळ या शब्दाचा इंग्रजी उच्चार संदर्भ लक्षात घेता बांधकाम किंवा पूल निर्मीती वेळी तयार झालेली वसाहत होय. पण मोडी कागदपत्रांतील उल्लेखामूळे ही उत्पत्ती खोडली जाते. कारण पेशवेकाळाच्या आगोदरपासून डिकसळ गावाचे उल्लेख येतात. दिगसळ किंवा दिगसाळ किंवा दिकसाल अशा स्वरूपाचे उल्लेख या गावाच्या नावासंदर्भात मोडी कागदपत्रांत येतात.

## गावचे पुनर्वसन-

उजनी धरणच्या फुगवटयामूळे डिकसळ गावाचे पुनर्वसन १९७६ साली करण्यात आले. हे पुनर्वसन गावाच्यारचनेचा कायापालट करणारे ठरले तसे ते आर्थिक कायापालट करणारे ठरेल. कारण धरणाच्या पाण्यामुळे बागायती शेती शक्य झाली. जून्या गावात पावसाळयात पूर येत असेव गावाचे स्वरूप पाण्यातील बेटा प्रमाणे होऊन बाहय जगाचा संपर्क तुटत असे. तसेच नदी असूनही बारमाही पाणी पुरवठयाची हमी नव्हती. तसेच दुष्काळाचे ही संकट असे.[1]

## सामाजिक - धार्मिक बाबी व उत्सव:-

सध्या गावात योगेश्वरी देवीचे, लक्ष्मी माता, मारूती, डिकसळाई इत्यादी हिंदू देवतांची मंदीरे असून, पीर हे मुस्लिम देवस्थानही आहे. योगेश्वरी देवी ही गावाची ग्रादेवता आहे. चैत्र शुध्द त्रयोदशीला देवीची यात्रा भरवली जाते.[2]योगेश्वरी देवीच्या यात्रेबरोबरच इतर अनेक सण साजरे केले जात. शिमग्याला शिराळ शेठचीमिरवणूक काढली जाते तर धुलवडीच्या दिवशी कुस्त्यांचे आयोजन केले जात असे.[3]गावच्यापुनर्वसनाच्या अगोदर गावात तालीम होती. त्यावेळी लाठयाकाठया, लेझीम, सोंगे आणणे असे सार्वजनिक / सांस्कृतिक उपक्रम गावात चालत असत.[4]गावच्यापुनर्वसना अगोदरच्या गावाठाणात योगेश्वरी देवीचे मोठे मंदीर होते. त्या दगडी गाभारा होता. मंदीराचा



मंडप हा सागवानी लाकडामध्ये बनविलेला होता.[5]गावात गवळी, सुर्यवंशी, गोसावी, भादेकर हे मूळ गावकरी असून सध्या गायकवाड (ठाकर), गायकवाड (खानवटे), सावंत, शिंदे या आडनावाची कुटुंबे आहेत.

### राजकीय माहिती:-

डिकसळ ग्रामपंचायतीची स्थापना १९६२ साली झालेली असून खालील प्रमाणे सरपंच होउन गेले. साहेबराव पवार -पहिले सरपंच,सुदाम शंकर पानसरे,अनंता गुलाब कुंभार,प्रभाकर तानाजी गायकवाड,ज्ञानदेव मारूती पवार,उपसरपंच उत्तम दादासो काळे,रावसो भाऊसो गवळी,उपसरपंच अंनता भाऊसो पवार,सौ. मनिषा शरद पवार,उपसरपंच - शशिकांत पांडूरंग शिर्के – कुंभार,अक्का तानाजी हगारे,उपसरपंच - प्रदिप मोहन पवार इत्यादी.

या व्यतिरीक्त अनेक गावकऱ्यांनी महत्त्वाची पदे भूषवली.जगन्नाथ पांडूरंग सुर्यवंशी हे १९६४ ते १९६८ या काळात इंदापूर तालुका खरेदी - विक्री संघाचे संचालक होते. तसेच ते इंदापूर तालूका लिफ्ट इरिगेशन फेडरेशनचे सदस्य होते.[6]तानाजी जगन्नाथ सुर्यवंशी हे २००८ साली इंदापूर तालूका खरेदी - विक्री संघाचे व्हाईस चेअरमन होते. तसेच २००९ ते २०१३ पर्यंत ते सदर संघाचे संचालक होते. गावाची पांरपारीक पाटीलकी पवार कुटुंबीयांकडे होती. सदाशिव गेनबा पाटील हे एके काळाचे गावाचे प्रसिध्द पाटील होते.[7]

### शैक्षणिक बाबी:-

१९४०साली गावात ख्रिश्चनांद्वारे चालवली जाणारी शाळा होती.[8]पुढे १९५० साली जिल्हा लोकल बोर्डा मार्फत गावात प्राथमिक शिक्षण देणारी शाळा सुरू केली. गावात सध्या चौथी पर्यंतचे शिक्षण उपलब्ध आहे.

### शेती व अर्थव्यवस्था:-

उजनी धरणामुळे पुनर्वसन होण्याच्या अगोदर जिरायती स्वरूपात शेती केली जात असे. शेतातील मुख्य पिक ज्वारी हे होते.[9]१९६०साली डिझेल इंजिन (कृषीपंप) आधारीत उपसा सिंचन सुरू झाले. डिझेलचा खर्च जास्त होता.[10]दि. ३१/०७/१९६८ रोजी योगेश्वरी कृषी पाणी पुरवठा संस्थेची स्थापना करण्यात आली. या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. जगन्नाथ पांडूरंग सुर्यवंशी हे होते. ते पुढे १९७६पर्यंत अध्यक्ष होते.[11]योगेश्वरी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीची स्थापना दि. १२/०९/१९६० रोजी झालेली असून कृषीपतपुरवठयासाठी संस्थेचे काम महत्वाचे ठरले आहे.



*भैरवनाथ पाणी पुरवठा सेवा सहकारी संस्था मर्यादित, भिगवण व योगेश्वरी कृषी पाणी पुरवठा सेवा सहकारी संस्था मर्यादित, डिकसळ या संस्थांच्या उद्घाटनप्रसंगी मा. शंकरराव पाटील, वसंतराव पाटील, राजेंद्र घोलप, चकोरशेठ जोशी तसेच स्थानिक मान्यवर.*



डिकसळ येथील पाणी पुरवठा संस्थेच्या पाणी उपसा यंत्रणेलगत संस्थेचे मान्यवर.

या संस्थचे होउन गेलेले चेअरमन पुढीलप्रमाणे आहेत.जगन्नाथ पांडूरंग गवळी,दगडू कृष्णा काळे,अनंता भाउसो काळे,वामनराव भाऊसो काळे,तानाजी दादासो हगारे आदि. सध्या जिजाराम दादासो पोंदकुले हे चेअरमन तर विजयकुमार गायकवाड हे व्हा. चेअरमन आहेत. २०१२ मधील ४० लांखाची उलाढाल असलेल्या संस्थने २०१३ मध्ये कोटींच्या पुढे व्यवहार केल्याचे दिसते. गावात योगेश्वरी महिला बिगरशेती पतसंस्था २००१ साली सुरू झाली असून सौ. शैलता विजयकुमार गायकवाड या पहिल्या अध्यक्षा असून त्यांनी २००८ ते २०१२ पासून सौ. संध्या सुनिल काळे या अध्यक्ष आहेत.उजनी धरणात पाणीसाठा वाढल्यानंतर डिकसळ गावात मासेमारीचा व्यवसाय जास्त विकसित झाला. सध्या मोठी उलाढाल असलेला असा हा व्यवसाय असून शेती नंतर हा मोठया लोकसंख्यद्वारे केला जाणारा व्यवसाय आहे.

## डिकसळ गावाला मिळालेले पुरस्कार:-

या गावाने इ.स.२००८ मध्ये अस्वच्छतेचे विरूध्द लढा देउन केंद्र सरकारचा निर्मलग्राम पुरस्कार मिळविला. महाराष्ट शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान व राष्टसंत तुकडोजी महाराज स्वच्छ वसुंदर ग्राम स्पर्धेत गावाने सहभाग घेतला. त्यामध्ये गावाने सन २००८ मध्ये तालुकास्तरीय तृतीय क्रमांक पटकावला होता. सन २००९-१० मध्ये तंटामुक्ती अभियानात सहभाग घेउन पुरस्कार मिळविला. पर्यावरण संतूलीत ग्राम योजनेमध्ये गावास सन २००९-१०, २०१०-११ व २०११-१२ असा तिन वर्ष पुरस्कार प्राप्त झाला.[12]

## डिकसळ - पुल व रेल्वे स्टेशन

डिकसळ गावच्या हददीत एक जूना पूल असून स्थानिक जेष्ठ नागरिक श्री. ज्ञानदेव पवार यांचे मते पुलाचे बांधकाम सन १८९६ ते १८९८ या काळात झाले आहे. सदर पुलाचे काम हे पुर्णतः दगडी असून गोभीक शैलीतील कमानींच्या रचनांचा वापर यात केलेला आहे हा पूल डिकसळला मौजे कोंढार चिंचोली ता. करमाळा जि. सोलापुर यांना जोडतो. सध्या पुलावरून रस्ता बनविलेला असला तरी पुर्वी या पूला वरून रेल्वेमार्ग होता. स्थानिकांच्या आठवणीनूसार १९४२ सालच्या चलेजाव आंदोलनाच्या काळात या पूलाला धोका होऊ नये म्हणून विशेष बंदोबस्त ठेवण्यात आला होता. अदयापही हा पूल डिकसळ पूल नावाने ओळखला जातो.

पुणे व सोलापूर शहरे रेल्वेमार्गाने जोडल्या नंतर डिकसळ गावालगत रेल्वेचे स्टेशन उभारले गेले त्या स्टेशनला डिकसळ स्टेशन असे नाव होते. मात्र सदर स्टेशनचा परिसर भिगवण गावचे हददीत असलेल्या भिगवणकरांनी या स्टेशनला भिगवण स्टेशन असे नाव देण्यासाठी प्रयत्न केले. स्वातंत्र्य प्राप्तीपर्यंत सदर स्टेशनला डिकसळ स्टेशन असेच नाव होते.

## मोडी कागदपत्रांतीलमाहिती:-

### वर्षासने:-

इ.स. १७०५ च्या मोडी पत्रानूसार राजश्री मूरार माधव गोसावी यांस आदेश देऊन वर्षासने देण्यासाठी सांगण्यात आलेले आहे. त्यानूसार गणेश गोसावी पिंपळनेरकर व रंगभट बीन भीवाभर पुजारी निंबालेश्वर महादेव या दोघांना प्रत्येकी १० रू. ची नेमणूक वर्षासन दिली होती.[13] इ.स. १८२५ मधील उपलब्ध कागदपत्रा नूसार अनेक व्यक्तींना वर्षासने दिल्याचे

उल्लेख आहेत.बाळंभट नरसिंह पुरकर, रामदासी चिंचोलीकर स्वामी, विठठलभट, सिवहर बरसकर, राघोबा पेटणकर, निवेंगीर गोसावी, श्रीधर भट व ज्ञावसाथ गोसावी यांना.[14]जहागीर/मुकासा/इनाम दिल्याचे संदर्भ प्राप्त होता.

### शाहू दप्तरातील उल्लेख पुढील प्रमाणे:-


हे गाव संताजी जाधव यांना मुकासा दिलेले होते.[15]पुढे हे गाव सरलष्कर निंबाळकर यांचेकडे मुकासा म्हणून होते. इंदापूर तालुक्यातील ४० गावे लष्कराच्या दिमतीस मुकासा म्हणून दिली होती.त्यामध्ये डिकसळचाही समावेश होता. इ.स. १७२७-२८ साली सरलष्कर सिदोजी निंबाळकर यांना दिलेली गावे शासनाने ताब्यात घेतली त्यामध्येही डिकसळचा समावेश होता.[16]डिकसळ संदर्भात इ.स. १७४१ सालची दोन पत्रे उपलब्ध असून एकाच आज्ञापत्राच्या वेगवेगळया व्यक्तींना पाठविलेल्या प्रती आहेत. त्यामुळे दवर्षी मेघःशाम (कमाविसदार, इंदापूर परगणे) यास सूचना असून विष्णू विश्वनाथ पंडित यास महाराज स्वामींनी (साताराच्या छत्रपतींनी) मौजे दिगसाल (डिकसळ) प्रांत इंदापूर हा गाव स्वराज्य व मोगलाइ दूतर्फा वंशपरंपरागत इनाम दिल्याचा उल्लेख आहे.[17]

इ.स. १७७६ सालाचे पत्र असून माधवराव नारायण पेशवे यांनी लिहलेले असून मौजे डिकसळ (दिगसाल) येथील मानसिंग खलाटे याचे घोडयांच्या तबेल्याकडे एक चावर (१२० बिघे अर्थात सुमारे १०० एकर अंदाजे) जमिन यशंवतराव निगडे, मुरारजी निगडे, भिकाजी निगडे, सेटीबा निगडे, कुसाजी निगडे, असरोजी निगडे, खंडेराव निंबाळकर, गुंडाजी निगडे व बळवंतराव मुळीक सिलेदार या निगडे मंडळीस दिली असा उल्लेख आहे.[18]इ.स. १७७८ सालचे मोडी पत्रानूसार राजश्री त्रिंबकजी गोसावी यास पत्र असून मौजे डिकसळ प्रांत इंदापूर हा सरकारातून निगडे मंडळींना दिल्याचे लिहले असून दखलगिरी न करणे असा आदेश दिला आहे.[19]या नंतरच्या वर्षभरातीलच पेशवांनी पाठविलेल्या आज्ञापत्र असून जीवा निगडे मंडळी शिलेदार यांस मौजे दिगसल हा गाव दिला होता तो वर्षांपुर्वी दुर करून अलिबहादर याच्या सरजामास दिला होता. तो पुन्हा दुर करून निगडे मंडळीना करार करून दिला आहे. तरी त्याचा अंमल होउ देणे व वसूलीस सुरूवात करावी असा आदेश यात आहे.[20]

### वस्ताद शिवाजी काळे :

डिकसळ गावचे एक गाजलेले व्यक्तिमत्व म्हणजे वस्ताद शिवाजी तात्याबा काळे हे होत. हे मूळचे डिकसळचे पण नंतर ते धुळे या शहरात स्थलांतरीत झाले. तेथे त्यांनी कुस्तीमध्ये लौकिक कमावला. एवढेच नव्हे तर तेथे एक तालिम बनवली. धुळे येथे त्यांच्या नावाने एक चौकाचे नामकरण करण्यात आले आहे. 'जिल्हा वस्ताद शिवाजी तात्याबा काळे चौक' असे त्याचौकास नाव देण्यात आले होते.[21]आजही डिकसळकरांना वस्ताद शिवाजी काळे यांचा अभिमान वाटत असल्याचे जाणवते.



**धुळे येथील शिवाजी काळे यांच्यासोबत स्थानिकांचा एका कार्यक्रमातील फोटो तसेच सोबत वस्ताद शिवाजी काळे यांचे प्रकाशचित्र**

डिकसळ हे उजनी धरणाच्या पानवठ्यालगत असलेले गाव असून मोडी कागदपत्रांचा संदर्भ पाहता या या गावाला मराठेकालीन इतिहासाचे संदर्भ पहायला मिळतात. तसेच गाव किमान मध्ययुगीन असावे अशी शक्यता व्यक्त होत. उजनी धरण झाल्यांनतर गावचा आर्थिक कायापालट झाल्याचे दिसून येत आहे.

---

[1]श्री. ज्ञानदेव पवार यांची मुलाखत

[2]श्री. जगन्नाथ सुर्यवंशी यांची मुलाखत.

[3]श्री. ज्ञानदेव पवारयांची मुलाखत.

[4]श्री. जगन्नाथ सुर्यवंशी यांची मुलाखत.

[5]श्री. ज्ञानदेव पवार यांची मुलाखत

[6]श्री. जगन्नाथ सुर्यवंशी.यांची मुलाखत.

[7]श्री. जगन्नाथ सुर्यवंशी.यांची मुलाखत.

[8]श्री. जगन्नाथ सुर्यवंशी व ज्ञानदेव पवार यांच्या मुलाखती.

[9]श्री. जगन्नाथ सुर्यवंशी यांची मुलाखत.

[10]श्री. अनंता भाउसो कुंभार यांची मुलाखत.

[11]श्री. जगन्नाथ सुर्यवंशी यांची मुलाखत.

[12]प्रा. चवरे प्रशांत, डिकसळकरांची फिनिक्स भरारी लेख अंतर्भूत, सकाळ वर्तमानपत्र.

[13]पुणे अभिलेखागार, पुणे जमाव रूमाल क्र. ७४३.

[14]उपरोक्त कागद क्र. ३६५०७.

[15]पुणे अभिलेखागार, शाहू दप्तर रूमाल क्र. ४३, पुडके क्र ३, पत्र क्र ६०१२३.

[16]उपरोक्त रूमाल क्र. २६, पुडके क्र. २, पत्र क्र. ३३३३३.

[17]पुणे अभिलेखागार, पुणे जमाव दप्तर, रूमाल क्र. ७४३.

[18]उपरोक्त.

[19]उपरोक्त.

[20]उपरोक्त.

[21]माहिती व फोटो उपलब्धता साभार श्री. अनिल काळे, डिकसळ.